खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरुनगर

## अर्थशास्त्र विभाग

### उपक्रम अहवाल

### २०२२ – २०२३

| अ.क्र. | उपक्रमाचे नाव | दिनांक | वर्ग |
|---|---|---|---|
| १. | **अर्थशास्त्र विचार मंच अंतर्गत निबंध स्पर्धा** | **बुधवार २८/९/२०२२** | **एफ.वाय.बी.ए.** |
| २. | **प्रश्नमंजूषा** | **गुरुवार १३/१०/२०२२** | **एफ.वाय.बी.ए.** |
| ३. | **स्वागत समारंभ** | **सोमवार १७/१०/२०२२** | **एस.वाय.बी.ए.** |
| ४. | **परिसंवाद (सेमीनार)** | **शनिवार २४/१२/२०२२** | **टी.वाय.बी.ए.** |
| ५. | **शैक्षणिक सहल** | **गुरुवार १२/०१/२०२३** | **एस.वाय/ टी.वाय.बी.ए.** |
| ६. | **२०२३-२४ अर्थसंकल्प चर्चासत्र** | **शुक्रवार १०/०२/२०२३** | **एस.वाय/ टी.वाय.बी.ए.** |
| ७. | **जागतिक महिला दिन** | **बुधवार ८/०३/२०२३** | **अर्थशास्त्र विभाग** |

**1.अर्थशास्त्र विचार मंच अंतर्गत निबंध स्पर्धा**

**बुधवार २८/९/२०२२**

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्षाच्या प्रथम सत्रात एफ.वाय.बी.ए. मधील; विद्यार्थांसाठी भारतीय आर्थिक पर्यावरण या विषयाच्या अनुषंगाने बुधवार दि.२८/९/२०२२ रोजी आयोजन करण्यात आले.सदर स्पर्धेसाठी भारतीय अर्थव्यवस्थेतील शेती क्षेत्राची भूमिका या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली.सदर निबंध स्पर्धामध्ये एकूण ४६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.सहभागी विद्यार्थ्यांपैकी तीन क्रमांक काढण्यात आले.

**२.प्रश्नमंजूषा उपक्रम**

**गुरुवार १३/१०/२०२२**

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर, अर्थशास्त्र विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्याच्या उद्येशाने एफ.वाय.बी.ए. मधील विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजूषा उपक्रमाचे आयोजन गुरुवार दि. १३/१०/२०२२ रोजी १०.१० ते ११.५० या वेळेत करण्यात आले.सदर उपक्रमासाठी एफ.वाय.बी.ए. अ, ब आणि क या तुकडीतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.या वर्गातील विद्यार्थ्यांना एकत्र करून त्यांचे दोन गट तयार करण्यात आले. सहभागी गटाला डॉ. अमर्त्य सेन, ॲडम स्मिथ असे नाव देण्यात आले.अर्थशास्त्र विभागातील प्रा.धानापुने एस.व्ही.आणि प्रा.खुरपे ए.डी.यांनी विद्यार्थ्याना प्रश्न विचारले.सदर उपक्रमासाठी एकूण ५७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

3. **स्वागत समारंभ**

**सोमवार १७/१०/२०२२**

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ , हुतात्मा राजगुरू महाविद्यालय खेड, अर्थशास्त्र विभागाच्या वतीने सोमवार १७/१०/२०२२ रोजी द्वितीय वर्षांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी स्वागत समारंभ आयोजित केला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे होते. तर प्रमुख उपस्थितीमध्ये उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रो.डॉ. आर. एस . शिरसी यांनी केले. अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांना अर्थव्यवस्थेतील सर्व क्षेत्रांमध्ये नोकरीच्या संधी असतात असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना करत मा. विभाग प्रमुखांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

या कार्यक्रमाच्या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डॉ. एस. एस. पिंगळे सर यांनी विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. तसेच नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांना या कार्यक्रमाच्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाच्या वेळी महाविद्यालयाचे कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी ते म्हणाले कि, अर्थशास्त्र प्रवेशित विद्यार्थ्यांना प्रत्येक एका पैशाचा वापर कसा करावा हे शिकवते. विद्यार्थ्यांना अर्थशास्त्रामध्ये करिअर करण्यास खूप संधी आहेत. विभागाचा फायदा घेऊन विद्यार्थ्यांनी त्या संधी आपल्याशा करून घ्याव्यात असेही ते म्हणाले.या कार्यक्रमाच्या वेळी अर्थशास्त्र विभागातील डॉ. यू.सी.भोकसे,प्रा.एस.व्ही.धानापुने,प्रा.ए.डी.खुरपे,प्रा.आर.एच.मुंढे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच विद्यार्थ्यांच्या वतीने कु. आरती शिंदे,कु.संदीप पावरा (टी .वाय .बी.ए.) मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन कु. प्रीती राक्षे आणि कल्याणी तारु(टी .वाय .बी.ए. ) आणि यांनी केले तर आभार कु. नेहा मुळूक (टी .वाय .बी.ए. ) हिने मानले.

**४.सार्वजनिक आयव्यय परिसंवाद (सेमीनार)**

**दि. २४/१२/२०२२**

अर्थशास्त्र विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्षाच्या (२०२२-२३) प्रथम सत्रात टि.वाय.बी.ए.मधील विद्यार्थ्यांसाठी सार्वजनिक आयव्यय १ या विषयाच्या परिसंवादाचे (सेमीनार) दि. २४/१२/२०२२ रोजी आयोजन करण्यात आले.

सदर परिसंवादामध्ये कु.नेहा मुळूक, ऋतुजा मुळूक,वैष्णवी शिंदे,कल्याणी तारु आणि मयूरी साकोरे या विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमासंदर्भात निवडक विषयांवर सादरीकरण केले.या परिसंवादाचे सूत्रसंचलन प्रीती राक्षे या विद्यार्थीनीने केले आणि आभार आरती शिंदे या विद्यार्थीनीने मानले. या परिसंवादात एकूण २२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

## ५. शैक्षणिक सहल

### दि.१२/०१/२०२३

अर्थशास्त्र विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्षाच्या (२०२२-२३) द्वितीय सत्रात एस.वाय .टि.वाय.बी.ए.मधील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सहलीचे आयोजन दि. १२/०१/२०२३ रोजी करण्यात आले.राजगुरुनगर –वाई –पाचगणी-प्रतापगड – महाबळेश्वर -राजगुरुनगर या मार्गाने शैक्षणिक सहलीचा मार्ग निश्चित करण्यात आला. या सहली दरम्यान पाचगणी येथे पारसी पॉइंट, प्रतापगड ऐतिहासिक ठिकाण , महाबळेश्वर बाजारपेठ (मार्केट),वेल्हा येथे स्वयं रोजगाराचे प्रात्याक्षिक दाखवण्यात आले.सदर शैक्षणिक सहलीचे आयोजन अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रो.डॉ. आर. एस . शिरसी यांनी केले. या सहलीसाठी एस.वाय .टि.वाय.बी.ए.मधील २३ विद्यार्थी आणि त्यांच्यासमवेत प्रा. प्रा.आर.एच.मुंढे, प्रा. ए.डी. खुरपे,प्रा.एस.एस.वाळुंज यांनी नियोजन करून सुरक्षितपणे आणि उत्साहाने सहल पार पाडली.

## ६.२०२३-२४ अर्थसंकल्प चर्चासत्र

### दि.१०/०२/२०२३

अर्थशास्त्र विभागाच्या एस.वाय.बी.ए.,टी.वाय.बी.ए., मधील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ष (२०२२-२०२३ ) Economic Forum या उपक्रमांतर्गत १ फेब्रुवारी २०२३ रोजी जाहीर झालेल्या अर्थसंकल्पावर चर्चासत्राचे आयोजन दि.१०/०२/२०२३ करण्यात आले.सदर चर्चासत्रात कु.मयुरी साकोरे, कु.वैष्णवी शिंदे, कुऐश्वर्या कोळेकर ,कु.श्रुती थोरात कु.केदारी वेदांत लांघी ,ओंकार गोपाळे ,सागर बनसोडे इत्यादी विद्यार्थ्यांनी विविध विषयावर आपले विचार मांडले. अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रो.डॉ. आर. एस . शिरसी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.उमेश भोकसे आणि प्रा.एस.व्ही.धानापुने यांनी या चर्चा सत्रांत सहभाग घेतला.

## ७. जागतिक महिला दिन

### दि. ८/०३/२०२३

अर्थशास्त्र विभागाच्या वतीने कला शाखेतील सर्व विदयाथ्र्यांसाठी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दि. ८/०३/२०२३ सकाळी ९.०० वाजता जागतिक महिला दिन – विशेष मार्गदर्शनपर संवाद आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमप्रसंगी डॉ.अर्चना आहेर (MIT महाविद्यालय,आळंदी ) यांचे “Gender Development” या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.या प्रसंगी अर्चना आहेर यांनी महिलांच्या सक्षमीकरण गरजेचे आहेच त्याचबरोबर पुरुषांच्या बरोबरीने मिळणाऱ्या संधीचा योग्य वापर करून महिलांनी आपले समाजातील स्थान उंचावणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.डॉ.अर्चना आहेर यांनी त्यांच्या स्वलिखित कवितेच्या माध्यमातून महिलांचे आपल्या जीवनातील स्थान अतिशय मार्मिक शब्दांत व्यक्त केले .सदर कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.एस.पिंगळे,उपप्राचार्य डॉ.एस.डी.शिंदे , अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ.आर.एस.शिरसी,डॉ.उमेश भोकसे ,प्रा.एस.व्ही.धानापुने,प्रा.एस.एस.वाळुंज,प्रा.आर.एच.मुंढे,प्रा.ए.डी.खुरपे उपस्थित होते.

## प्रश्नमंजूषा कार्यक्रमाची क्षणचित्रे





## स्वागत समारंभ कार्यक्रमाची क्षणचित्रे





## अर्थशास्त्र विचार मंच अंतर्गत निबंध स्पर्धा क्षणचित्रे





**सार्वजनिक आयव्यय परिसंवाद (सेमीनार) कार्यक्रमाची क्षणचित्रे**






**शैक्षणिक सहल क्षणचित्रे**





**जागतिक महिला दिन (प्रमुख व्याख्याता – डॉ.अर्चना आहेर ) कार्यक्रमाची क्षणचित्रे**






HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA
RAJGURU NAGAR

विभाग प्रमुख
अर्थशास्त्र
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर,जि.पुणे

विभाग प्रमुख
प्रो.डॉ.आर.एस.शिरसी